# परिपत्रक

## विषय : सिंचन प्रकल्पांतर्गत पिक आरखडा/पिक पद्धतीस मंजुरी प्रदान करणे बाबत सुधारीत मार्गदर्शक सुचना

**पार्श्वभुमी :**

राज्यातील नियोजित पाटबंधारे/सिंचन प्रकल्पास व काही कार्यान्वीत पाटबंधारे/सिंचन प्रकल्पास केंद्रीय जल आयोग, नवी दिल्ली यांची प्रशासकीय मान्यता मिळविण्यासाठी प्रचलीत पद्धतीनुसार प्रकल्पातील समाविष्ट क्षेत्रातील पिक पद्धतीस कृषि विभागाची मान्यता घ्यावी लागते. या संदर्भात कृषि विभागाच्या दि. १९ नोव्हेंबर १९९१ च्या परिपत्रकान्वये तत्कालिन परिस्थितीत पिक आराखडा/ पिक पद्धतीस मंजुरी प्रदान करणेबाबत मार्गदर्शक सुचना निर्गमीत केलेल्या आहेत. राज्यात एकूण ९ कृषि हवामान विभाग असून बदलत्या हवामान परिस्थितीनुसार (क्लायमेट चेंज) व जमिनीच्या प्रकारानुसार पीक पध्दतीत स्थानिक पातळीवर सातत्याने बदल होत आहेत. त्यादृष्टीने बदलत्या परिस्थितीनुसार पाटबंधारे/सिंचन प्रकल्पानुसार पीक पध्दतीबाबत सुक्ष्म नियोजन होणे गरजेचे आहे.

सन १९९८ मध्ये कृषि खात्याच्या पुर्नरचनेत एक खिडकी पद्धतीचा अवलंब करण्यात आला. त्यामुळे उपरोक्त परिपत्रकातील सुचनांमध्ये जिल्हास्तरीय प्रमुख म्हणून "प्रमुख कृषि अधिकारी (प्रशिक्षण व भेट योजना)" या पदनामाऐवजी आता "जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी" असा बदल झालेले आहे.

वरील तांत्रीक व प्रशासकीय बदलांच्या पार्श्वभुमीवर सिंचन प्रकल्प क्षेत्रातील पिक पद्धतीस मंजुरी प्रदान करण्याबाबत यापूर्वी दि. १९ नोव्हेंबर १९९१ च्या परिपत्रकान्वये निर्गमित मार्गदर्शक सूचनांत अनुषंगीक बदल करणे आवश्यक होते. याचा विचार करता या परिपत्रकान्वये सुधारित मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येत आहेत. या पूर्वीच्या मार्गदर्शक सुचना अधिक्रमित करुन सुधारीत मार्गदर्शक सुचना निर्गमीत करण्यात येत आहेत व त्या निर्गमीत झाल्यापासून लागू करण्यात येत आहेत.

**सुधारित मार्गदर्शक सुचना :**

राज्यातील नियोजित पाटबंधारे/सिंचन प्रकल्प व काही कार्यान्वीत पाटबंधारे/सिंचन प्रकल्प यांचे सिंचन क्षमतेनुसार व्याप्त होणारे सिंचित क्षेत्र लक्षात घेता प्रकल्पांचे छोटे प्रकल्प, मध्यम प्रकल्प व मोठे प्रकल्प असे वर्गीकरण केले जाते. नियोजन आयोगाने सिंचीत क्षेत्रानुसार केलेल्या प्रकल्पांच्या वर्गीकरणानुसार २००० हेक्टर क्षेत्रापेक्षा कमी निव्वळ सिंचीत क्षेत्र (Culturable Command Area (CCA)) असल्यास असे प्रकल्प छोटे प्रकल्प सदरात येतात. २००० ते १०,००० हेक्टर निव्वळ सिंचीत क्षेत्राचे प्रकल्प मध्यम व १०,००० हेक्टर पेक्षा जास्त निव्वळ सिंचीत क्षेत्राचे प्रकल्प मोठे प्रकल्प सदरात येतात. काही प्रकल्पांचे सिंचित क्षेत्र केवळ एका जिल्ह्यात राहते, तर काही प्रकल्पांच्या सिंचित क्षेत्राची व्याप्ती एकापेक्षा जास्त जिल्ह्यात राहते. कृषि हवामान विभागानुसार प्रकल्पाची सिंचन क्षेत्र व्याप्ती एका किंवा अधिक कृषि हवामान विभागात येवू शकते. राज्यातील एकूण ९ कृषि हवामान विभाग चार कृषि विद्यापीठांच्या कार्यकक्षेत विभागलेले आहेत. कृषि विद्यापीठात जमिनीचा प्रकार, पर्जन्यमान व बदलत्या हवामान परिस्थितीनुसार पीक रचनेचा अभ्यास करुन पीकांच्या शास्त्रोक्त पध्दतीने शिफारसी केल्या जातात. प्रकल्प मंजूरी पासून प्रत्यक्ष कार्यान्वीत होईपर्यंतच्या कालावधीत पीक रचनेत स्थानिक परिस्थितीनुरुप अनेक बदल होत राहतात.

सिंचन प्रकल्पास केंद्रीय जल आयोगाची प्रशासकीय मान्यता मिळविण्यासाठी प्रकल्पातील समाविष्ट क्षेत्रातील पिक पद्धतीस कृषि विभागाची मान्यता देण्याचे दृष्टीने कृषि विद्यापीठातील कृषि विद्या विभाग, सिंचन विभाग, मृद शास्त्र विभाग व कृषि अर्थशास्त्र विभाग यांच्या संयुक्त शिफारसी तसेच संबंधीत जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी व विभागीय कृषि सहसंचालक यांच्या संयुक्त विद्यमानाने पिक आराखडा/ पिक पद्धतीस मंजुरी प्रदान करणे संयुक्तीक ठरते. याचा विचार करता सिंचन प्रकल्पाच्या क्षमतेनुसार छोट्या प्रकल्पास संबधीत जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, मध्यम प्रकल्पास संबधीत विभागीय कृषि सहसंचालक आणि मोठ्या प्रकल्पास कृषि संचालक (विस्तार व प्रशिक्षण), महाराष्ट्र राज्य हे प्रकल्पाच्या पिक आराखडा/पिक पद्धतीस मंजुरी देतील.

प्रकल्प प्रस्ताव पिक आरखडा/पीक पद्धतीस मंजुरीसाठी प्रकल्पाचा सर्वांगीण विचार करुन जिल्हा/विभाग/राज्य स्तरावर खालील प्रमाणे समिती स्थापन करण्यात येत आहे.

| अध्यक्ष/सदस्य | जिल्हा स्तर | विभागीय स्तर | राज्य स्तर |
|---|---|---|---|
| अध्यक्ष | जिल्हा आधिक्षक कृषि अधिकारी | विभागीय कृषि सहसंचालक | कृषि संचालक (वि.प्र.) |
| सदस्य | कृषि विद्यापिठ/शासकिय कृषि महाविद्यालयाचे सिंचन, मृद शास्त्र, अर्थशास्त्र, कृषि विद्या विभाग प्रमुख/तज्ञ | कृषि विद्यापिठ/शासकिय कृषि महाविद्यालयाचे सिंचन, मृद शास्त्र, अर्थशास्त्र, कृषि विद्या विभाग प्रमुख तज्ञ / | कृषि विद्यापिठ/शासकिय कृषि महाविद्यालयाचे सिंचन, मृद शास्त्र, अर्थशास्त्र, कृषि विद्या विभाग प्रमुख/तज्ञ |
| सदस्य | संबधित उपविभिगिय कृषि अधिकारी/तालुका कृषि अधिकारी | संबधित जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, उपविभागिय कृषि अधिकारी | संबधित जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, उपविभगिय कृषि अधिकारी |
| सदस्य | संबधित प्रकल्पाचे अधिक्षक अभियंता/ कार्यकारी अभियंता | संबधित प्रकल्पाचे अधिक्षक अभियंता/कार्यकारी अभियंता | संबधित प्रकल्पाचे अधिक्षक अभियंता/कार्यकारी अभियंता, शास्त्रज्ञ (वाल्मी) |
| सदस्य सचिव | कृषि उपसंचालक, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालय | विभागीय अधिक्षक कृषि अधिकारी | कृषि सहसंचालक (विप्र १) |

- छोट्या सिंचन प्रकल्पात ज्यावेळी प्रकल्पाचे क्षेत्र एकाच जिल्ह्यात समाविष्ठ असेल त्यावेळी संबधीत जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी त्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा स्तरीय समितीची सभा आयोजीत करुन पिक आराखडा/पिक पद्धतीस मंजुरी प्रदान करावी.
- ज्यावेळी छोटा प्रकल्प एका पेक्षा जास्त जिल्ह्यात समविष्ट असेल त्यावेळी प्रकल्पाचे जास्त क्षेत्र ज्या जिल्ह्यात आहे ते जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी समितीचे अध्यक्ष राहतील व इतर जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी सहअध्यक्ष राहतील. संबंधीत अध्यक्ष यांनी समितीची सभा आयोजीत करुन पिक आराखडा/ पिक पद्धतीस मंजुरी प्रदान करावी.
- मध्यम प्रकल्पात ज्यावेळी प्रकल्पाचे क्षेत्र एकाच कृषि विभागात समाविष्ठ असेल त्यावेळी संबधीत विभागीय कृषि सहसंचालक यांनी त्यांच्या अध्यक्षतेखाली समितीची सभा आयोजीत करुन पिक आराखडा/ पिक पद्धतीस मंजुरी प्रदान करावी.
- ज्यावेळी मध्यम प्रकल्पाचे सिंचन क्षेत्र एका पेक्षा जास्त कृषि विभागात समविष्ट असेल त्यावेळी प्रकल्पाचे जास्त क्षेत्र ज्या विभागात आहे ते विभागीय कृषि सहसंचालक अध्यक्ष राहतील व इतर विभागीय कृषि सहसंचालक सहअध्यक्ष राहतील. अध्यक्ष यांनी समितीची सभा आयोजीत करुन पिक आराखडा/पिक पद्धतीस मंजुरी प्रदान करावी.
- मोठ्या प्रकल्पाच्या पिक आराखडा/पिक पद्धतीस मंजुरी आदा करण्यासाठी वरील प्रमाणेच संबंधीत विभागीय कृषि सहसंचालक यानी त्यांच्या कार्यक्षेत्रातील प्रकल्पाबाबत स्थानिक परिस्थितीचा विचार करुन त्यांच्या अधिनस्त समितीची सभा आयोजीत करुन पिक आराखडा/पिक पद्धतीस मंजुरी देण्यासाठी सर्व सदस्यांच्या स्वाक्षरीने कृषि संचालक (विस्तार व प्रशिक्षण) यांच्याकडे सविस्तर तपशीलासह सुस्पष्ट शिफारस करावी. त्या आधारे सदर प्रकल्पातील पिक आराखडा/पिक पद्धतीस कृषि संचालक (विस्तार व प्रशिक्षण) मंजुरी देतील.
- वरील पार्श्वभूमीवर केवळ मोठे प्रकल्प यापुढे आयुक्तालयीन स्तरावर सर्व प्रक्रीया पूर्ण करुन समितीतील सर्व सदस्यांच्या स्वाक्षरीने मान्यतेस्तव पाठवावेत. इतर छोटे व मध्यम प्रकल्प यासाठी जिल्हा/विभाग स्तरावरील समितीने मान्यता द्यावी. असे प्रकल्प यदाकदाचीत थेट आयुक्तालयास सादर केले गेल्यास ते संबंधीत समितीकडे सादर करण्यासाठी परत केले जातील व त्याचे विलंबाची जबाबदारी प्रकल्प सादर करणा-या संस्थेची राहील, याची कृपया नोंद घ्यावी.

**पाटबंधारे/जलसंपदा विभागाने पिक आरखडा/पिक पद्धतीस मंजुरी प्रदान करण्यासाठी प्रस्ताव सादर करताना प्रस्तावासोबत सादर करावयाच्या कागदपत्रांचा तपशील खालील प्रमाणे,**

१) प्रकल्प कोणत्या स्वरुपाचा (छोटा/मध्यम/मोठा) आहे हे सुरुवातीस व्याप्त सिंचन क्षेत्र, जिल्हा इ. सह नमुद करावे. ज्या स्वरुपाचा प्रकल्प असेल त्यानुसार संबंधीत समितीकडे प्रकल्प सादर करावा.

२) नियोजित सिंचन प्रकल्पास राज्य एकात्मिक जल आराखड्यांतर्गत सदर प्रकल्पातून नियोजित पाणी सिंचनासाठी उपलब्ध होणार आहे या बाबत सविस्तर तपशिलासह प्रमाणपत्र जोडावे.

३) प्रकल्प उपसा सिंचन स्वरुपाचा असल्यास, पाणी उपलब्ध करुन देण्यासाठीचा सर्व खर्च प्रकल्प खर्चात अंतर्भूत असल्याचे सविस्तर तपशिलासह प्रमाणीत करण्यात यावे.

४) नियोजित प्रकल्पाचा सिंचन कालावधी (चारमाही/आठमाही/बारामाही) प्रस्तावात सुस्पष्ट नमुद करावा.

५) हंगाम कालावधीत नियोजित सिंचनाखाली येणा-या सिंचन क्षेत्रात लागवड हंगामाच्या अनुषंगाने वेळेत सिंचन उपलब्ध होणार असलेबाबत सविस्तर तपशिलासह प्रमाणपत्र द्यावे.

६) नियोजित प्रकल्प साखळी पध्दतीच्या कोल्हापूर पद्धतीच्या बंधा-यात पाणी साठवून त्याद्वारे सिंचन पध्दतीचा असल्यास, त्यामध्ये बंधा-यातील गाळ काढणे, आवश्यकतेप्रमाणे शेतकरी/शेतकरी गटामार्फत उपसा सिंचन इ. बाबी एफ १ व एफ २ मध्ये नमुद करुन स्वाक्षरीत करुन द्याव्यात.

७) सदर प्रकल्प उपसा सिंचन स्वरुपाचा असल्यास, पाणी वापर संस्था स्थापन करुन, आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे पाण्याचा वापर काटेकोरपणे करण्याचे दृष्टीने केलेले नियोजन द्यावे.

८) सदर प्रकल्पाद्वारे तालुकानिहाय व गावनिहाय, उपसा सिंचन असल्यास उपसा सिंचन निहाय किती क्षेत्र ओलीताखाली येणार आहे, त्याची सविस्तर माहिती प्रस्तावात देण्यात यावी.

९) नियोजित प्रकल्पांतर्गत प्रकल्प मंजुरी पुर्वीची पिक रचना/पीक पध्दती, आजमितीस प्रत्यक्षात असलेली पिक रचना/पीक पध्दती तसेच, प्रकल्प कार्यान्वीत झाल्यानंतर उपलब्ध होणाऱ्या सिंचन सुविधेमुळे अपेक्षित बदलानुसार प्रस्तावित पिक रचना/पीक पध्दती आणि दरम्यानच्या काळात बदलत्या तंत्रज्ञानामुळे होणारे पिक रचनेतील बदल उदा. सुक्ष्म सिंचन, हरित गृहातील शेती इत्यादी चा सर्वांगीण साकल्याने विचार करून त्याबाबतच्या सविस्तर तपशिलाची नोंद करुन प्रस्तावित सिंचन प्रकल्पातील पिक रचना/पीक पध्दतीस प्रकल्पाच्या सिंचन क्षमतेनुसार कृषि विभागाच्या संबधीत समिती कडे मान्यतेसाठी सादर करावा.

१०) यासाठी गावनिहाय एकूण क्षेत्र, आजमितीस गावातील विहिरी व कूपनलिकांमार्फत होणारे सिंचन क्षेत्र (चार माही/आठमाही/बारामाही), सदर प्रकल्पाद्वारे गावनिहाय एकूण क्षेत्रापैकी किती क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे, प्रत्यक्ष सिंचनासाठी उपलब्ध होणारे पाणी, उपलब्ध होणा-या सिंचनाचा कालावधी, पाणी उपलब्ध करुन द्यावयाची पध्दत, पाणी वापर संस्थांचे नियोजन, सिंचन पध्दती इ. विचारात घेण्यासाठी आवश्यक माहिती नकाशासह प्रस्तावात सादर करावी.

११) नियोजित प्रकल्पापुर्वी सिंचनाच्या उपलब्ध स्त्रोतापासून (नदी, तलाव इ.) किती क्षेत्र सिंचित होत होते, आणि प्रकल्पानंतर किती क्षेत्र पाण्याखाली जाणार व किती क्षेत्र नव्याने सिंचनाखाली येणार आहे याची माहिती प्रस्तावात सादर करावी.

१२) नियोजित सिंचन प्रकल्पातून पाणी कोणत्या पध्दतीने (कॅनॉल, उपसा सिंचन) इत्यादी सिंचन सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे व प्रति हेक्टर सिंचनांचा खर्च इत्यादी माहिती प्रस्तावात सादर करावी.

१३) नियोजित सिंचन प्रकल्पातर्गत सिंचनाची आवर्तने, पाणी वापर संस्था इत्यादी बाबत सविस्तर माहिती व आवर्तन निहाय नियोजन प्रस्तावात सादर करावे.

१४) नियोजित प्रकल्पाद्वारे सिंचनासाठी मंजूर पाणी साठ्यातून आणि सरासरी पर्जन्यमान विचारात घेऊन पीकनिहाय पाण्याच्या आवश्यकतेनुसार आणि प्रस्तावित पीक रचना/पिक पध्दतीनुसार सुधारीत पेनमन पध्दतीचा अवलंब करून सिंचनाचा ताळमेळ घालून तपशील प्रस्तावात सादर करावा.

१५)नियोजित सिंचन प्रकल्पांच्या अनुषंगाने केंद्र शासनास सादर केलेला प्रस्ताव, संबधीत एमआरसॅकचे नकाशे, मृदा बाबत एनबीएसएस ची माहिती आणि गावांचे एकूण भौगोलीक क्षेत्र आणि त्यापैकी गावनिहाय सिंचनाखाली येणाऱ्या क्षेत्राची प्रस्तावित व्याप्ती यांची माहिती प्रस्तावात अंतर्भुत करावी.

१६)नाबार्डने काही सिंचन प्रकल्पांच्या केलेल्या अभ्यासावरून असे अभिप्राय दिलेले आहेत की, उपलब्ध होणाऱ्या सिंचनामुळे लागवडीची तिव्रता (क्रॅापीग इन्टेंसिटी) मध्ये वाढ होणे अपेक्षीत आहे. तसेच उपलब्ध होणाऱ्या सिंचनामुळे अधिकचे उत्पादन, अधिक आर्थिक नफा देणाऱ्या पिकाखालील वाढणारे क्षेत्र, उपलब्ध होणारे सिंचन, पाण्याच्या पाळया तसेच, नियोजीत सिंचन क्षेत्र आणि पिक रचनेतील बदलानुरूप विक्रीसाठी अपेक्षीत बाजारपेठ इत्यादी बाबीचा विचार करुन पिकरचना निश्चीत करणे अपेक्षीत आहे. याचा साकल्याने प्रस्ताव सादर करताना विचार करुन त्यांचा प्रस्तावात अंतर्भाव करावा.

प्रकल्प पीक रचना/पीक पध्दतीसाठी मान्यतेकरीता सादर करताना वरील सर्व बाबींची पूर्तता केल्याची संबंधीत यंत्रणेने खात्री करावी, जेणेकरुन त्यास मान्यतेची कार्यवाही करणे कृषि विभागास व संबंधीत समितीस सुलभ होईल.

पिकांच्या उत्पादकता वाढीसाठी सिंचन हा अत्यंत महत्वाचा घटक आहे. राज्यातील एकूणच सिंचन क्षेत्र मर्यादित स्वरुपाचे असल्याने नियोजित सिंचन प्रकल्पातील पीक रचना/पीक पध्दती निश्चित करताना अन्नधान्य सुरक्षा, प्रत्येक थेंबातून अधिक उत्पादन आणि शाश्वत शेती पध्दती इत्यादीवर विषेश भर देण्याची आवश्यकता आहे. वरील सर्व बाबी साकल्याने विचारात घेऊन नियोजित सिंचन प्रकल्पाच्या क्षमतेनुसार संबंधीत स्तरावरुन पीक रचना/पीक पध्दतीस कृषि विद्यापीठाच्या सल्ल्याने मान्यता प्रदान करावी व त्याची प्रत कृषि आयुक्तालयास सादर करावी. कोणत्याही परिस्थितीत वरीलप्रमाणे निश्चित करुन दिलेल्या समितीच्या शिफारशीशिवाय प्रकल्प थेट कृषि आयुक्तालयास सादर करण्यात येऊ नयेत. प्रकल्प प्रस्ताव थेट आयुक्तालयास सादर केल्यास ते संबधीत समितीद्वारे कार्यवाहीसाठी नाईलाजाने परत केले जातील व त्यातील कालापव्ययाची जबाबदारी संबधीत प्रस्ताव सादर करणा-या यंत्रणेची राहील.

०७/०७/१७

**(सचिन्द्र प्रताप सिंह** भा.प्र.से.**)**
**आयुक्त कृषि, महाराष्ट्र राज्य, पुणे**

जाक्र/कृआ/विप्र-३/पिआ/मंजुरी/७७२/२०१८
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे ५
दि.१३/०६/२०१८

प्रति,

विभागिय कृषि सहसंचालक (सर्व)
जिल्हा अधिक्षक कृषि अधिकरी (सर्व)
याना माहिती तथा पुढील कार्यवाहीसाठी

प्रत - माहितीसाठी सविनय सादर
मा. अप्पर मुख्य सचिव (कृषि), महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
मा. प्रधान सचिव, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई

प्रत - माहीती व पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषीत
कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद
कार्यकारी संचालक, कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे
कार्यकारी संचालक, महाराष्ट्र कृष्णा खोरे पाटबंधारे विकास महामंडळ, पुणे
कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर
कार्यकारी संचालक, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव
कृषि विद्या विभाग/सिंचन विभाग/मृद शास्त्र विभाग/अर्थशास्त्र विभाग, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी
कृषि विद्या विभाग/सिंचन विभाग/मृद शास्त्र विभाग/अर्थशास्त्र विभाग,पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,अकोला
कृषि विद्या विभाग/सिंचन विभाग/मृदशास्त्र विभाग/अर्थशास्त्र विभाग,बाळासाहेब सावंत,कोंकण कृषि विद्यापीठ,दापोली
कृषि विद्या विभाग/सिंचन विभाग/मृदशास्त्र विभाग/अर्थशास्त्र विभाग वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी